N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT
**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** मिरा-भाईदर, वसई-विरार **P.S.(ठाणे):** तुळींज

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0482 **Year (वर्ष):** 2024

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 27/06/2024 07:46

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7(a) |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** बुधवार
**Time Period (कालावधी):** पहर 5
**Date From (दिनांक पासून):** 26/06/2024
**Date To ( दिनांक पर्यंत):** 26/06/2024
**Time From (वेळेपासून):** 13:20 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 13:20 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 27/06/2024 **Time (वेळ):** 07:06 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 008

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 27/06/2024 07:06 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पूर्व, 03 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** दुर्गा मेडीकल,बादशहा बाबा अपार्टमेंट, ,नालासोपारा पुर्व

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**



Scanned with CamScanner

**6. Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** अशोक उमाशंकर विश्वकर्मा
(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**
(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1992
(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत
(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**
(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**
**Date of Issue (दिल्याची तारीख):**
**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**
(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | 03बि विंग,ओम तुलसी अपार्टमेंट,गालानगर,नालासोपारा पुर्व,तुळींज,मिरा-भाईदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | 03बि विंग,ओम तुलसी अपार्टमेंट,गालानगर,नालासोपारा पुर्व,तुळींज,मिरा-भाईदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**
(j) **Phone number (फोन नं.):**
**Mobile (मोबाइल नं.):** 91-8097792496

**7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | सौ.आरती शिरीष कांबळे | | | 1. लोकसेवक,औषध निरीक्षक , पालघर,तुळींज,मिरा-भाईदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय, महाराष्ट्र,भारत |
| 2 | श्री.[illegible]कुमार आशाराम तिवारी | | | 1. डी 104 ,साईसदन बिल्डींग नं2,तुळींज रोड, अंबावाडी, नालासोपारा पुर्व,तुळींज,मिरा-भाईदर, वसई-विरार पोलीस |



Scanned with CamScanner

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

तात्काळ दाखल.

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | जप्त माल1,00,000/ रुपये लाचेची रक्कम (500/ रुपये दराच्या 200 चलनी नोटा. 1,00,00 | 100,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

100,000.00

11. **Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12. **First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

मी अशोक उमाशंकर विश्वकर्मा, वय-32 वर्षे, व्यवसाय-मेडीकल शॉप, रा. रूम न. 3, बि-विंग, ओम तुलसी अपार्टमेंट, गालानगर, नालासोपारा पुर्व, मोबाईल न. 8097792496 असा असून समक्ष फिर्याद लिहुन देतो की, मी वरील पत्यावर कुटूंबासह राहतो. माझे शॉप, नं. 04, लोढा विर सावरकर नगर, आचोळे रोड, नालासोपारा पुर्व येथे जेनरिक मार्ट नावाचे मेडीकल दुकान असून माझ्याकडे मेडीकल दुकान चालविण्याचे लायसन्स आहे. दिनांक 14/06/2024 रोजी मी जनरिक मार्ट मेडीकल दुकानात असताना श्रीमती आरती कांबळी, ड्रग्स इन्स्पेक्टर पालघर या इन्स्पेक्षन करीता आल्या होत्या. त्यावेळी त्यांच्या सोबत तिवारी नावाचे खाजगी इसम हे होते. त्यावेळी श्रीमती आरती कांबळी यांनी मी मेडीकल मधील विक्री केलेल्या औशधांची बिले व नोंदी ठेवल्या नसल्याने पुढील आदेश होईपर्यंत मला मेडीकल बंद ठेवण्यास सांगून दिनांक 18/06/2024 रोजी रूम नं. 104, प्रशासकीस इमारत अ, पालघर-बोईसर रोड, पालघर येथील कार्यालयात भेटण्याकरीता येण्यास सांगीतले. त्याप्रमाणे मी दिनांक 18/06/2024 रोजी लोकसेविका सौ.आरती कांबळे यांचे पालघर येथील वर नमुद कार्यालयात भेटलो असता, लोकसेविका आरती कांबळी यांनी मला मेडीकल दुकान पुन्हा सुरू करायचे असल्यास 1,00,000/- रू दयावे लागतील असे सांगून त्याबाबत पुढील बोलणी दिनांक 14/06/2024 रोजी इन्स्पेक्षन दरम्यान त्यांचेसोबत आलेली खाजगी व्यक्ती श्री.तिवारी यांच्याशी बोलणी करण्यास सांगीतले. त्यानंतर लोकसेवक श्रीमती आरती कांबळी यांनी मला मेडीकल बंद ठेवण्यास सांगून लायसन्स कॅन्सल का करण्यात येवू नये म्हणून नोटीस दिली. त्यानंतर मी श्री. तिवारी यांचे मोबाईल क्र.9503990163 वर व्हाटस् अँप द्वारे कॉल करून बोलणी केली असता प्रत्येकवेळी त्यांनी मेडीकल दुकान चालू ठेवण्यासाटी लोकसेवक श्रीमती आरती कांबळे यांनी सांगितल्या प्रमाणे 1,00,000/- रूपये द्याव लागतील व ते पैसे माझेकडे जमा करा असे सांगून लाचेची मागणी केली. परंतू मला लोकसेवक श्रीमती आरती कांबळी तसेच खाजगी इसम श्री.तिवारी यांना लाचेची रक्कम देण्याची इच्छा नसल्याने त्यांच्याविरूध्द योग्य ती कारवाई होणेबाबत माझा मित्र श्री.प्रदीप दुबे यांच्या मार्फतीने मा.पोलीस उप अधीक्षक श्री गावडे यांचेषी फोनव्दारे दिनांक 20/06/2024 रोजी संपर्क करून माझी तक्रार सांगून दिनांक 21/06/2024 रोजी विरार फाटा येथे भेटण्याची विनंती केली होती.

त्याप्रमाणे दिनांक 21/06/2024 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पालघर कार्यालयाचे पोलीस उप अधीक्षक श्री.दयानंद गावडे हे मला व माझे मित्र श्री.प्रदीप दुबे यांना विरार फाटा येथे भेटले. त्यावेळी प्रदिप दुबे यांनी पोलीस उप अधीक्षक श्री गावडे यांचेशी माझी ओळख करून देवून मी माझ्या हस्ताक्षरात लिहून आणलेली तक्रार श्री गावडे



Scanned with CamScanner

यांना दाखविली त्यांनी ती वाचून पाहीली त्यावेळी त्यांनी त्यांच्यासोबत आणलेले दोन पंच यांची व पडताळणी पथकाची माझी ओळख करून दिली. मी दिलेल्या लेखी तक्रारीवर पोलीस उप अधीक्षक श्री गावडे व सोबतच्या पंचानी सहया केल्या. काही वेळा नंतर माझे मित्र प्रदिप दुबे यांना त्यांच्या कामासाठी बाहेर जायचे असल्याने पोलीस उप अधीक्षक श्री.गावडे यांच्या परवानगीने ते त्यांच्या कामासाठी निघून गेले.

त्यानंतर मी दिलेल्या तक्रारीच्या अनुशंगाने पोलीस उप अधीक्षक श्री. दयानंद गावडे यांनी खाजगी इसम श्री.तिवारी हे लाचेची मागणी करतात अगर कसे? याची पडताळणी करण्यात येणार असल्याचे सांगून करण्यात येणा-या पडताळणी कारवाई बाबत थोडक्यात माहीती दिली.

श्री.तिवारी हे माझेशी व्हाटस् अँप द्वारे फोनवरून बोलणी करीत असल्याने त्यांना माझा मोबाईल नंबर 8097792496 वरून व्हाटस् अँप द्वारे त्यांचा मोबाईल नंबर 9503990163 फोन करून फोनवरून होणारे संभाशण व्हाईस रेकॉर्डरच्या मदतीने ध्वनिमुद्रीत करून लाचेच्या मागणीची पडताळणी करण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर मी माझे मोबाईल नंबर वरून श्री.तिवारी यांना फोन केला असता, त्यांनी मला नालासोपारा पुर्व येथील राधाक्रिष्णा हॉटेलमध्ये भेटण्यास बोलाविले. त्याप्रमाणे मी पंच नं. 1 यांचेसह त्यांना भेटण्यासाठी हॉटेल राधाक्रिष्णा येथे जाताना आम्हाला थोडा वेळ झाल्याने श्री.तिवारी हे तेथून निघून गेले. त्यामुळे त्यांची व माझी भेट झाली नाही. त्यानंतर पुन्हा मी पडताळणी पथकाजवळ आल्यानंतर पुन्हा माझे मोबाईल फोनवरून फोन करून भेटण्याबाबत विनंती केली असता, श्री.तिवारी यांनी मला भेटण्यास टाळाटाळ केली. सदरच्या पडताळणी कारवाई दरम्यान खाजगी इसम श्री.तिवारी यांनी 'मॅडम नी सांगीतल्याप्रमाणे मी तुम्हाला सांगीतले आहे. पुन्हा पुन्हा काय सांगायचे' असे म्हणून लाचेच्या मागणीस दुजोरा दिला. परंतू नेमकी किती रक्कम दयावयाची आहे. याबाबत बोलणी झाली नसल्याने दि. 24/06/2026 रोजी पुन्हा पडताळणी करण्याचा निर्णय घेण्यात आला.

पोलीस उप अधीक्षक श्री. दयानंद गावडे यांनी दिलेल्या सुचनेप्रमाणे मी दिनांक 24/06/2024 रोजी नालासोपारा पुर्व, अलकापुरी, संयुक्त नगर येथील साईबाबा मंदीरासमोर पोलीस उप अधीक्षक श्री. दयानंद गावडे यांची भेट घेतली. त्यानंतर लाचेच्या मागणीची पडताळणी करण्यासाठी माझे वर नमुद मोबाईल नंबर वरून श्री.तिवारी यांच्या वर नमुद मोबाईल नंबरवर दोन वेळा फोन केला असता, श्री.तिवारी यांनी सुरवातीला आवांतर बोलुन "मुझे फोन मत करो असे म्हणून फोन कट केला" व त्यानंतर लोकसेवक आरती कांबळी यांच्याशी बोलणी करण्यास सांगीतले. त्यानंतर माझे वर नमुद मोबाईल नंबरवरून लोकसेवक आरती कांबळी यांचा मोबाईल क्र. 8097792496 वर व्हाटस् अँप द्वारे फोन करून तो व्हाईस रेकॉर्डव्दारे ध्वनीमुद्रीत करून लाचेच्या मागणीची पडताळणी करण्याचा निर्णय घेतला. व त्याप्रमाणे लोकसेवक आरती कांबळी यांना फोन केला असता, लोकसेवक आरती कांबळी यांनी "आप तिवारीजी से बात करो, तुमने आज ऑफीस नही आया, अभी छोडो मै अभी दुसरे जगह हुं. मिलो" असे सांगीतले त्यावर मी त्यांना "मॅडम तिवारी जी. जैसा बोलते है वैसा कर लु क्या" असे विचारले असता, त्यांनी "हां...हां...हां..." असे म्हणून होकार दिला. व फोन कट केला.

त्यानंतर पुन्हा माझे वर नमुद मोबाईल नंबरवरून श्री.तिवारी यांच्या मोबाईल वर व्हाटस् अँप द्वारे फोन करून लोकसेवक आरती कांबळी मॅडम नी त्यांच्याशी बोलणी करण्यास सांगीतले असल्याबाबत बोलून त्यांनी यापुर्वी माझेकडे मागणी केलेल्या लाचेच्या रक्कमेत काही कमी करण्यासाठी विनंती केली असता, त्यांनी मुझे फोन मत करो असे म्हणून फोन कट केला. त्यानंतर थोडया वेळाने पुन्हा श्री.तिवारी यांना फोन करून काय करायचे आहे ते फायनल सांगण्याची विनंती केली असता, त्यावर श्री तिवारी यांनी "हा आपको तो बोला हुं ना कितने बार बोल चुका" त्यावर मी "हां एक लाख आपने बोला है, तो वही बताओ ना फायनल कितना कर दुं. असे विचारले. त्यावर तिवारी यांनी "वही एक, ओ जो बोले, उपरसे वही" असे सांगीतले. त्यावर मी त्यांना "एक लाख ना?" असे विचारले. त्यावर श्री.तिवारी यांनी "हां" असे म्हणून होकार दिला. त्यानंतर मी त्यांना "तो कहां पे करना है कैसे करना है" असे विचारले. त्यावर श्री.तिवारी यांनी "रेडी होगा तो फोन करो" असे सांगीतले. त्यावर मी "एक दो घंटे मे रेडी करके फोन करता हु" असे सांगून फोन ठेवला. सदरच्या फोनवरील पडताळणी दरम्यान श्री.तिवारी यांनी यापुर्वी सांगीतल्याप्रमाणे एक लाख रूपये दयावे लागतील असे सांगून "ओ जो बोले उपर से वही" असे म्हणून लोकसेविका श्रीमती आरती कांबळी यांनी सांगीतल्याप्रमाणे 1,00,000/- रू लाचेची मागणी केल्याचे निश्पन्न झाले आहे.

त्यानंतर मी सापळा कारवाई लागणारी 1,00,000/- रू लाचेची रक्कम पोलीस उप अधीक्षक श्री.गावडे यांचेकडे हजर केली, त्यामध्ये 500/- रूपये दराच्या 200 चलनी नोटा असून त्यावर सापळा पुर्व पंचनाम्याची कार्यवाही पुर्ण झाल्यानंतर श्री.तिवारी यांना फोन करून लाचेची रक्कम घेवून कोठे भेटावयाचे आहे याबाबत विचारणा केली असता, त्यांनी "मै बोलता हूं मै बाहर हुं" असे म्हणून फोन कट केला.

त्यानंतर बराच वेळ श्री.तिवारी यांचा फोन येण्याची वाट पाहीली परंतू तरीही श्री.तिवारी यांचा फोन आला नाही.



Scanned with CamScanner

त्यामुळे पुन्हा माझे मोबाईल नंबदरवरून श्री तिवारी यांना व्हाटस् अँप द्वारे फोन केला परंतू तेंव्हाही त्यांनी भेटण्यास टाळाटाळ केली. त्यामुळे लाचेचा सापळा आजमाविता आला नाही. त्यामुळे उदया दिनांक 25/06/2024 रोजी पुन्हा श्री.तिवारी यांचेशा संपर्क साधून त्यांनी मागणी केल्याप्रमाणे लाचेची रक्कम तयार असल्याचे सांगून भेटीबाबत बोलणी करण्याचे ठरविले. सदरबाबत सविस्तर पंचनामा करण्यात आलेला आहे.
त्यानंतर दिनांक 25/06/2024 रोजी मी पोलीस उप अधीक्षक श्री.गावडे यांच्या सांगण्याप्रमाणे नालासोपारा पुर्व, अलकापुरी, संयुक्त नगर येथील साईबाबा मंदीरासमोर येथे येवून सापळा पथकाची भेट घेतली. व त्यानंतर लाचेची रक्कम कोठे घेवून भेटायाचे याबाबत विचारणा करण्यासाठी माझ्या मोबाईल फोन वरून श्री.तिवारी यांना व्हाटस् अँप फोन करून बोलणी केली असता ''दोपहर को फोन करो'' असे सांगीतले. त्यानंतर थोडया वेळाने श्री.तिवारी यांना पुन्हा फोन केला असता, त्यांनी ''कल मिलो, कल मॅडम को बुलाया हु, कल मॅडम के सामने मिलो'' असे बोलून ''मॅडम जहां बोलेगी वहां आना, और लेके आना हं, काम करना है तो लेके आना दौडना नही'' असे सांगुन मागणी केलेली लाचेची रक्कम स्विकारण्याची तयारी दर्शविली. परंतु दुस-या दिवशी म्हणजे 26/06/2024 रोजी मॅडमच्या समोर रक्कम घेवून येण्यास सांगितल्याने दिनांक 25/06/2024 रोजी लाचेचा सापळा आजमाविता आला नाही. त्यामुळे दिनांक 26/06/2024 रोजी पुन्हा यांचेशी संपर्क साधून सापळा आजमाविण्याचे ठरविले. सदरबाबत सविस्तर पंचनामा करण्यात आलेला आहे.
त्यानंतर दिनांक 26/06/2024 रोजी पोलीस उप अधीक्षक श्री.गावडे यांच्या सांगण्याप्रमाणे मी नालासोपारा पुर्व, अलकापुरी, संयुक्त नगर येथील साईबाबा मंदीरासमोर येथे सापळा पथकाची भेट घेतली. त्यानंतर माझे मोबाईल फोन वरून श्री.तिवारी यांना व्हाटस् अँप द्वारे फोन करून त्यांनी मागणी केलेली लाचेची रक्कम केंव्हा व कोठे घेवून यायचे आहे याबाबत विचारणा केली असता, त्यांनी ''मॅडम से मिलोगे कि मुझसे मिलोगे, मुझसे मिलने का होता तो पहले मिल लिया होता ना, अभी आपको डायरेक्ट मॅडम से मिला देता हुं. तुम्हारा डाउटफुल ही खतम'' असे अवांतर बोलणे करून भेटण्याबाबत काहीएक सांगीतले नाही. त्यानंतर श्री.तिवारी यांना पुन्हा फोन करून भेटण्याच्या ठिकाणाबाबत बोलणी केली परंतू तेंव्हाही त्यांनी केवळ मला त्रास देण्याचे उद्देशाने अवांतर बोलणे करून भेटण्याबाबत बोलणे टाळले.
त्यानंतर सर्वांशी चर्चेअंती लोकसेवक आरती कांबळी यांना फोन करून त्यांनी सांगीतल्याप्रमाणे श्री.तिवारी यांना फोन केला परंतू ते भेटण्यास वेळ देत नसल्याने आरती कांबळी मॅडम यांच्याशी बोलणी करण्याचे ठरविले. त्याप्रमाणे माझे मोबाईल नंबरवरून लोकसेवक आरती कांबळी यांच्या मोबाईल नंबरवर फोन करून त्यांना आपण सांगिल्याप्रमाणे श्री तिवारी हे मला भेटत नाहीत असे सांगितल्या नंतर, त्यांनी ''तो तुम आज विरार मे आओ, विरार स्टेशन मे आओ उनको मिलो'' असे सांगीतले. त्याप्रमाणे सापळा पथकासह विरार येथे जावून आरती कांबळी यांना फोन करून विरार येथे आल्याचे सांगीतले. त्यावेळी लोकसेवक आरती कांबळी यांनी ''आप तिवारी जी से मिलो ना आज मै उनको बोलती हुं.'' असे सांगून फोन ठेवला.
त्यानंतर पुन्हा श्री.तिवारी यांना फोन करून लोकसेवक आरती कांबळी यांनी त्यांना भेटण्यास सांगीतले असल्याबाबत बोलणी केली असता, त्यांनी ''तुमको विरार मे बुलाया है तो मै क्यों विरार जाउं'' असे म्हणून ''मॅडम ला सांगून तुझे दुकान आणखी पंधरा विस दिवस बंद करायला लावतो'' अशी धमकी देवून भेटण्यास टाळाटाळ करून फोन कट केला.
त्यानंतर पुन्हा लोकसेवक आरती कांबळी यांचा मोबाईलवर फोन करून ''तिवारी जी से बात हुवा ओ विरार आने को तैयार नही है'' असे सांगीतले असता लोकसेवक आरती कांबळी यांनी ''तो उधर जाओ ना'' असे सांगीतले.

Scanned with CamScanner

त्यावर मी ''आपका बात हुआ क्या उनसे'' असे विचारले असता, त्यांनी ''नही मै बात करती हूं'' असे म्हणून फोन ठेवला. लोकसेवक आरती कांबळी यांनी श्री.तिवारी यांचेकडे जावून भेटण्यास सांगीतले असल्याने व मला श्री.तिवारी यांचे मोरेगाव येथील मेडीकल दुकान माहीती असल्याने तेथे लाचेच्या रक्कमेसह जावून लाचेचा सापळा आजमाविण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर दिनांक 24/06/2024 रोजीच्या सापळा पुर्व पंचनामा कार्यवाही केलेल्या 500/- रू दराच्या 200 नोटा माझेकडे एका लखोटयात सुरक्षीत ठेवल्या होत्या. त्या नोटांची पुन्हा एकदा शासकीय वाहनात तपासणी करून त्या दिनांक 24/06/2024 रोजीच्या सापळापुर्व पंचनामा दरम्यान नोंदविलेल्या होत्या. तसेच त्यावर आथ्रासीन पावडरची चकाकी असल्याची खात्री केली. व सदरच्या लाचेच्या रक्कमेसह मी व पंच नं. 1 असे श्री.तिवारी यांचे मोरेगाव नाका बादशाह बाबा अपार्टमेंट मधील दुर्गा मेडीकल येथे गेलो. त्यावेळी श्री.तिवारी यांना ''मॅडम बोली जाके डायरेक्ट तिवारीजी से मिलो, मै तिवारी जी से बात करती हूं." असे लोकसेवक आरती कांबळी यांनी सांगीतल्याबाबत बोललो. त्यावेळी त्यांनी अवांतर थोडे बोलणे केल्यानंतर त्यांनी ''लाया...पैसा लाया?" असे विचारले असता, मी त्यांना हां म्हणून होकार दिला. त्यावर श्री.तिवारी यांनी ''रख के जाओ इधर रखो और निकलो...नही लाये हो तो रिटर्न जाओ, मेरा खाली एक ही लाईन मे बात ही रहता है...लाये हो तो रखो नही रिटर्न जाओ...उसके बिना कुछ होता ही नही है'' असे म्हणून ''पहेले तुम्हांरा होता ना तो दुकान भी खुल जाता, तुम्हारे पिछे पिछे का लोगोका खुल गया'' असे बोलले. त्यावेळी मी त्यांना ''ये लो साहाब गिनके लो'' असे म्हणून माझे पॅन्टच्या खिशातील लाचेची रक्कम काढूनं श्री.तिवारी यांच्यासमोर धरली असता, ती त्यांनी त्यांच्या उजव्या हाताने स्विकारून दोन्ही हातांनी मोजू लागले. त्यावेळी पंच नं. 1 हे माझेसोबत होते. त्यानंतर मी लाचेची रक्कम स्विकारल्याचा पुर्व नियोजीत इशारा केला. त्यावेळी सापळा पथकाने श्री.तिवारी यांना ताब्यात घेतले. तसा सविस्तर सापळा पंचनामा करण्यात आलेला आहे.

माझे शॉप नं. 04, लोढा विर सावरकर नगर, आचोळे रोड, नालासोपारा पुर्व येथे जेनरिक मार्ट मेडीकल स्टोटरमध्ये नियमांचे उल्लघन केल्याने नोटीस देवून बंद ठेवलेले मेडीकल स्टोअर परत चालु करण्याकरीता लोकसेवक आरती शिरीश कांबळे, औषध निरीक्षक, पालघर-1, यांच्या सांगण्यावरून खाजगी इसम श्री .कृष्णकुमार आशाराम तिवारी, वय-52 वर्षे, रा. डी-104, साईसदन बिल्डींग न. 2, तुळींज रोड, अंबावाडी, नालासोपारा पुर्व, ता. वसई, जि.पालघर यांनी माझेकडे एक लाख रूपयाच्या लाचेची मागणी करून ती लाचेची रक्कम दिनांक 26/06/2024 रोजी 13.20 वा. दुर्गा मेडीकल, बादशाहा बाबा अपार्टमेंट, नालासोपारा पुर्व येथे लोकसेवक आरती कांबळी यांच्या वतीने खाजगी इसम कृष्णकुमार तिवारी यांनी माझेकडून स्विकारली असता त्यांना रंगेहात पकडले आहे. म्हणून माझी लोकसेविका सौ. आरती शिरीष कांबळे, औषध निरीक्षक, पालघर-1 व खाजगी इसम कृष्णकुमार आशाराम तिवारी, वय-52 वर्षे, रा. डी-104, साईसदन बिल्डींग न. 2, तुळींज रोड, अंबावाडी, नालासोपारा पुर्व, ता. वसई, जि.पालघर यांचेंविरूध्द कायदेशिर फिर्याद आहे.

सदरची फिर्याद ही मी सांगितल्याप्रमाणे मराठीत संगणकावर टंकलीखीत केली असून त्याची प्रिंट काढून मला हिंदीतून समजावून सांगितले ती माझे सांगण्याप्रमाणे बरोबर व खरी आहे.

Scanned with CamScanner

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2. (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

(1) **Registered the case and took up the investigation:**
**(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):**

Shailendra Raghunath Nagarkar(I (Inspector)) / **or (किंवा)**

(2) **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):**

**Rank (पद):** **No.(क्र.):**

**to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

(3) **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**

**or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)**

(4) **Transferred to P.S.**
**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (जिल्हा):**

**on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)**

**R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)**

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):**

15. **Date and time of dispatch to the court**
**(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

पोलीस ठाणे अम्मलदार
तुळींज पोलीस ठाणे
मि. भा. व. वि. पोलीस आयुक्तालय

**Signature of Officer in charge, Police Station**
**(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)**

**Name (नाव):** Shailendra Raghuna
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):**



Scanned with CamScanner

**Attachment to item 7 of First Information Report** (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र): **Physical features, deformities and other details of the ( If known / seen )**(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्टये, व्यंग आणि इतर तपशील))

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म तारीक/ वर्ष) | Build (बांधा) | Height (cms.) (उंची(सें. मी.)) | Complexion (रंग) | Identification Mark (s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | महिला | | | | | चेचक के दाग: NO |
| 2 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा / बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल्याच्या खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)



Scanned with CamScanner